**<u>नियमित दिवाणी दावा क्र.४६२/२०२४ मधील निशाणी क्र.२१ वरील आदेश</u>**

<u>(वनिता वि. व्यंकट व इतर)</u>

<u>(CNR NO.MHLA060013172024)</u>

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १, ४ ते ६ यांनी त्यांच्याविरुद्ध दि.०७.०१.२०२५ रोजी झालेला 'विना कैफियत' दावा चालविण्याचा आदेश रद्द होण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जाचे अवलोकन केले. वादी यांनी म्हणणे दाखल न केल्याने त्यांच्या म्हणण्याशिवाय आदेश पारित करण्यात येत आहे. अभिलेखाचे अवलोकन केले.

**३.** प्रतिवादी क्र. १, ४ ते ६ यांनी अर्जात असे कथन केले आहे की, दावा हा वाटणी व पृथक कब्जासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना दिनांक २७.०१.२०२४ रोजी दाव्याच्या समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु प्रतिवादी हे काही महत्त्वांच्या कागदपत्रांच्या शोधात होते. जे त्यांना लेखी कैफियत दाखल करण्यास आवश्यक होते. ते कागदपत्र जुने असल्याने प्रतिवादी यांना ते वेळेत उपलब्ध झालेले नाहीत. प्रतिवादी हे कैफियत दाखल करण्यास आता तयार आहेत. प्रतिवादी यांच्या अधिकारांचा दावा प्रश्न आहे. प्रतिवादी यांनी जाणीवपुर्वक विलंब केलेला नाही. प्रतिवादी यांना कैफियत देण्याची संधी न दिल्यास त्यांचे अपरिमीत नुकसान होणार आहे. सबब, त्यांनी त्यांच्याविरूध्द दिनांक ०७.०१.२०२५ रोजी झालेला विना कैफियत दावा चालविण्याचा रद्द करण्यात यावा अशी मागणी केलेली आहे.

**४.** अर्ज दि.१८.०९.२०२५ रोजीचा आहे. प्रतिवादी क्र.१, ४ ते ६ यांना दि. २७.०१.२०२४ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. अर्जामध्ये कोणते कागदपत्र प्रतिवादी यांना आवश्यक होते व ते मिळून आलेले नाहीत याबाबत स्पष्ट उल्लेख नाही. झालेला विलंब लक्षात घेता कारण संयुक्तीक वाटत नाही. विलंबामुळे दाव्याचे कामकाज लांबणीवर पडलेले आहे. परंतु दाव्याचे स्वरूप लक्षात घेता प्रतिवादींना संधी मिळणे आवश्यक वाटते. विलंब पैशाने भरून काढता येवू शकतो. म्हणून, अर्ज खर्चासह मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश;

**<u>आदेश</u>**

१. अर्ज रक्कम रुपये १,५००/— खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१, ४ ते ६ विरुद्ध झालेला 'विना कैफियत' दावा चालविण्याचा आदेश रद्द करण्यात येतो.

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.01.09 16:45:21 +0530

दि.०९.०१.२०२६.

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
अहमदपूर, जि.लातूर.

<u>**नियमित दिवाणी दावा क्र.४६२/२०२४ मधील निशाणी क्र.१९ वरील आदेश**</u>
<u>(वनिता वि. व्यंकट व इतर)</u>
<u>(CNR NO.MHLA060013172024 )</u>

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ४ ते ६ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला २९६ दिवसाचा विलंब माफ होण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जाचे अवलोकन केले. वादी यांनी म्हणणे दाखल न केल्याने त्यांच्या म्हणण्याशिवाय आदेश पारित करण्यात येत आहे. अभिलेखाचे अवलोकन केले.

**३.** प्रतिवादी क्र. १, ४ ते ६ यांनी अर्जात असे कथन केले आहे की, दावा हा वाटणी व पृथक कब्जासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना दिनांक २७.०८.२०२४ रोजी दाव्याच्या समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु प्रतिवादी हे काही महत्त्वांच्या कागदपत्रांच्या शोधात होते. जे त्यांना लेखी कैफियत दाखल करण्यास आवश्यक होते. ते कागदपत्र जुने असल्याने प्रतिवादी यांना ते वेळेत उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे ते त्यांची कैफियत मुदतीत दाखल करू शकले नाहीत. सबब त्यांनी अर्ज मंजूर होण्याची विनंती केली आहे.

**४.** अर्ज दि.१८.०९.२०२५ रोजीचा आहे. प्रतिवादी क्र.१, ४ ते ६ यांना दि. २७.०८.२०२४ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. अर्जामध्ये कोणते कागदपत्र प्रतिवादी यांना आवश्यक होते व ते मिळून आलेले नाहीत याबाबत स्पष्ट उल्लेख नाही. झालेला विलंब लक्षात घेता कारण संयुक्तीक वाटत नाही. विलंबामुळे दाव्याचे कामकाज लांबणीवर पडलेले आहे. परंतु दाव्याचे स्वरूप लक्षात घेता प्रतिवादींना संधी मिळणे आवश्यक वाटते. विलंब पैशाने भरून काढता येवू शकतो. म्हणून, अर्ज खर्चासह मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश;

<u>**आदेश**</u>

१. अर्ज रक्कम रुपये १,५००/— खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१, ४ ते ६ कडून लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला २९६ दिवसांचा विलंब माफ करण्यात येतो.

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.01.09 16:45:14 +0530

दि.०९.०१.२०२६.

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
अहमदपूर, जि.लातूर.